(इंग्रजीत टंकलिखित न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद)

**मुंबई येथील उच्च न्यायालयाच्या न्यायाधिकारात**

**नागपूर खंडपीठ : नागपूर**

**रिट याचिका (रि. या.) क्र. २१३७/२०२२**

चंद्रशेखर वल्द देवीदास देशमुख,

वय अंदाजे ६९ वर्षे, धंदा- सेवानिवृत्त,

रा. द्वारे- विजयराव राजेश्वर देशमुख,

छाया कॉलोनी, आदिवासी वसतिगृहाच्या मागे,

जुना अकोली रोड, अमरावती .. याचिकाकर्ता

.. विरुद्ध ..

१. अमरावती महानगरपालिका,

त्याच्या आयुक्त, जिल्हा अमरावती मार्फत.

२. उपायुक्त (प्रशासन),

अमरावती महानगरपालिका, अमरावती.

३. महाराष्ट्र राज्य,

त्याच्या सचिव,

नगरविकास विभाग, मंत्रालय,

मुंबई मार्फत. .. उत्तरवादी

..........

श्री. प्रकाश डी. मेघे, याचिकाकर्त्याचे वकील

श्री. जे. बी. कासट, उत्तरवादी क्र. १ आणि २ चे वकील,

श्री. एन. एस. राव, सहाय्यक सरकारी वकील, उत्तरवादी क्र. ३- राज्यासाठी.

..........

**न्यायमंच** : **न्यायमूर्ती रोहित बी. देव आणि न्यायमूर्ती श्रीमती वृषाली व्ही. जोशी,**

**दिनांक** : **२८/०२/२०२३**

**<u>मौखिक न्यायनिर्णय</u> (न्यायमूर्ती रोहित बी. देव द्वारे)**

ऐकले. **अधिनिर्णय**. अधिनिर्णय जारी करून पक्षकारांच्या संमतीने त्यावर उत्तर तत्काळ मागविण्यात आले.

२. सदर याचिका ही खालीलप्रमाणे कायम दिलासा मिळण्यासाठी दाखल करण्यात आलेली आहे :

> "(i) दिनांक २८/०८/२००२ (जोडपत्र -III) रोजीच्या आरोपपत्राच्या आधारे उत्तरवादी क्र. १- आयुक्त, अमरावती महानगरपालिका, अमरावती यांनी चालविलेली चौकशी बेकायदेशीर आणि नैसर्गिक न्यायतत्वाचे विरुद्ध आहे, असे धरून जोडपत्र- X मधील चौकशी अहवाल रद्दबातल करणे.
>
> (ii) पुढे असे मानावे आणि घोषित करावे की, चौकशी अधिका-याने दिनांक : निरंक रोजी सादर केलेला जोडपत्र- X वरील चौकशी अहवाल बेकायदेशीर आणि कायद्याच्या चौकटीत बसणारा नाही.
>
> (iii)दिनांक:२२/०५/२००७ रोजी उत्तरवादी क्र.२-उपायुक्त(प्रशासन), अमरावती महानगरपालिका यांनी कामावरून काढून टाकण्याबद्दल जोडपत्र - XII वर पारित केलेला आदेश रद्दबातल करणे.
>
> (iv) याचिकाकर्त्याला दिनांक २७/०५/२००७ पासून त्याच्या सेवानिवृत्तीच्या तारखेपर्यंत म्हणजेच दिनांक ३१/०८/२०१० पर्यंत, पूर्ण वेतनासह त्याची पुनर्नियुक्ति करण्यासाठी उत्तरवादींना निर्देश देण्यात यावे.
>
> (v) पुढे, दिनांक ०१/०९/२०१० पासून निवृत्ती वेतनाची थकबाकी, उपदान आणि दर वर्षी १२ टक्के च्या दराने व्याजासह प्रदान

करण्यासाठी उत्तारवादींना निर्देश देण्यात यावे.

(vi) उत्तरवादी क्रमांक १ आयुक्त, अमरावती महानगरपालिका यांना, सामान्य भविष्य निर्वाह निधी आणि गट विम्याची रक्कम आणि पाचव्या वेतन आयोगाची थकबाकी दरवर्षी १२% या दराने व्याजासह याचिकाकर्त्यास देण्याचे निर्देश देण्यात यावे".

३. दिनांक २८ एप्रिल २०२२ च्या आदेशानुसार नोटीस जारी करताना, समन्वय खंडपीठाने याचिकाकर्त्यांच्या विद्वान वकिलांनी केलेले निवेदन नोंदविले की प्रार्थना खंड (i) ते (iv) मधील आव्हान जोरदारपणे मांडले जात नाही, कारण विलंबामुळे आव्हानास फटका बसला आहे ज्यामुळे अडथळा निर्माण झाला आहे. सदर निवेदनाच्या दृष्टीने, नोटीस ही याचिकाकर्त्याला निवृत्तीवेतनाचा लाभ मिळण्याचा हक्क आहे या निवेदनापुरती मर्यादित होती.

४. पुढील तथ्ये सामान्यपणे निर्विवाद आहेत :-

(अ) याचिकाकर्ता अमरावती महानगरपालिकेच्या आस्थापनेवर 'कर संग्राहक' म्हणून काम करीत होते.

(ब) याचिकाकर्त्याने नागरिकांकडून कर रक्कम गोळा केली आणि कर रक्कम जमा करण्याऐवजी त्याची अफरातफर केली, या आरोपाच्या संदर्भात याचिकार्त्याचे विरुद्ध विभागीय चौकशी करण्यात आली.

(क) विभागीय चौकशी अंती तो दोषी असल्याचा निष्कर्ष काढण्यातआला. याचिकाकर्त्याने १९९७-९८ आणि २०००-२००१ दरम्यान रुपये २,२८,९९९/- आणि १२/०२/२००० आणि ३१/०३/२००१ या कालावधीत रुपये ३१,०००/- ची अफरातफर केल्याचा आरोप योग्यपद्धतीने सिद्ध झाला.

(ड) याचिकाकर्त्याला दिनांक २२/०५/२००७ रोजीच्या आदेशाद्वारे सेवेतून काढून टाकण्यात आले.

(ई) असे दिसते की याचिकाकर्त्यावर अभियोग देखील चालवला गेला आणि अभियोगाच्या निकालात निर्दोष सुटका झाली. याचिकेत असे उद्धृत केले आहे की, दिनांक

१२/१०/२०१७ रोजीच्या न्यायनिर्णयाद्वारे, याचिकार्त्यास भारतीय दंड संहितेच्या कलम ४०६ आणि ४०९ अंतर्गत गुन्ह्यासाठी निर्दोष मुक्त करण्यात आले.

(फ) ते काहीही असो, याचिकेत समाविष्ट असलेल्या मुद्यासंदर्भात दोषमुक्तीचा कोणताही संबंध नाही.

५. आम्ही दिनांक २१/०२/२०२३ रोजी काही काळ श्री. मेघे यांचे म्हणणे ऐकले आणि असे सूचित केले की याचिकाकर्त्याला अफरातफर केल्याच्या आरोपावरून सेवेतून काढून टाकण्यात आल्यामुळे याचिकाकर्त्याला निवृत्तीवेतनाचा हक्क आहे असे निवेदन दूरगामी असल्याचे दिसते. श्री. मेघे यांनी या विधानासह प्रतिसाद दिला की सकृतदर्शनी दृष्टिकोन बदलण्यासाठी ते आमचे मन वळवतील.

६. जे नियम लागू आहेत, ते महाराष्ट्र नागरी सेवा (सेवानिवृत्ती ) नियम १९८२ (नियमावली) आहेत, यात वाद नाही. श्री. मेघे यांनी सदर निवेदनाचे समर्थन करण्यासाठी आमचे लक्ष नियम १९ कडे वेधले, ज्याचे अनुसार 'काढून टाकणे' आणि 'बडतर्फ करणे' यात मूलभूत फरक आहे. आम्ही नियम १९ मधील उतारा खालीलप्रमाणे शब्दशः घेऊ शकतो :-

> **" नियम १९ : गैरवर्तणूक, नादारी किंवा अकार्यक्षमता याबद्दल सेवेतून काढून टाकणे किंवा सक्तीची सेवानिवृत्ती :**
>
> सक्षम प्राधिकारी, या नियमांच्या अधीन राहून, कोणत्याही शासकीय कर्मचाऱ्याला गैरवर्तणूक, नादारी किंवा अकार्यक्षमता या कारणांवरून शासकीय सेवेतून काढून टाकू शकेल किंवा सक्तीने सेवानिवृत्त करू शकेल:
>
> मात्र, असा कोणताही आदेश काढण्यापूर्वी, महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियमावली १९७९ च्या नियम ८ ते १५ मध्ये उल्लेख केलेली कार्यपद्धती अनुसरली पाहिजे :
>
> टीप १ : दुय्यम दर्जाच्या पोलीस अधिकाऱ्यांच्या बाबतीत, पोलीस विभागातील सक्षम प्राधिकारी, मुंबई पोलीस नियमपुस्तिका १९५९ खंड (I) मधील प्रकरण- XIII आणि मुंबई पोलीस अधिनियम १९५९

च्या कलम २६ मध्ये दिलेल्या कार्यपद्धतीचा अवलंब करून, या नियमानुसार विवेकाधिकाराचा वापर करू शकतो.

टीप २ : शिवाय जेथे स्पष्टपणे असेल, अन्यथा 'सेवेतून काढून टाकणे' यामध्ये, या नियमान्वये सेवानिवृत्त होण्यास सांगितलेल्या शासकीय कर्मचाऱ्यांच्या प्रकरणाचा अंतर्भाव होतो.

७. श्री. मेघे यांनी ज्या दुसऱ्या नियमावर विश्वास दर्शविला आहे, तो नियमावलीतील नियम १०१ आहे जो उचित प्रकरणांमध्ये अनुकंपा निवृतीवेतन देण्याशी संबंधित आहे. नियमावलीतील नियम १०१ खालील प्रमाणे आहे :-

**" नियम १०१ : उचित प्रकरणांमध्ये अनुकंपा निवृत्तिवेतनास शासनाकडून मंजुरी :**

(१) सेवेतून काढून टाकण्यात आलेल्या सरकारी कर्मचाऱ्याला त्याचे निवृत्तीवेतन आणि उपदान यांचे समपहरण करावे लागेल :

परंतु जर खास विचारात घेण्यासारखे प्रकरण असेल, तर सरकार निवृत्तीवेतन किंवा उपदान किंवा दोन्हीपेक्षा २/३ हुन अधिक नसणारे अनुकंपा निवृत्तीवेतन मंजूर करू शकते, जे तो अनुकंपा निवृत्तिवेतनावर निवृत्त झाला असता तर त्याला अनुज्ञेय झाला असता.

(२) उपनियम (१) च्या तरतुदींनुसार अनुकंपा निवृत्तीवेतन सरकारने निश्चित केलेल्या किमान निवृत्तिवेतनापेक्षा कमी नसावी.

(३) बडतर्फ शासकीय कर्मचारी अनुकंपा निवृत्ती वेतनास पात्र नाही.

८. श्री. मेघे यांनी जोरदारपणे मांडलेल्या सेवेतील वैधानिक तरतुदींव्यतिरिक्त, सारख्याच, अधिक नसल्यास, नियमावलीतील नियम २६ आणि २७ सारख्याच तरतुदी आहेत. नियम २६ मध्ये अशी परिकल्पना दिली आहे की, निवृत्तीवेतन हे चांगल्या वर्तनाच्या आचरणाच्या अधीन आहे आणि नियम २७ नियोक्ताच्या निवृत्ती वेतन रोखण्याच्या किंवा काढून घेण्याच्या अधिकाराशी संबंधित आहे. नियम २६ आणि २७ पुढीलप्रमाणे आहेत :-

**"नियम २६: चांगल्या वर्तणुकीवर निवृत्तीवेतन अवलंबून असणे :**

(१) प्रत्येक निवृत्तीवेतन किंवा कौटुंबिक निवृत्तीवेतन देण्यामागे पुढील काळांतील चांगली वर्तणूक ही निहित शर्त असेल. जर निवृत्तिवेतन धारकाला किंवा कौटुंबिक निवृत्तीवेतन धारकाला गंभीर गुन्ह्याबद्दल किंवा गंभीर गैरवर्तणुकीबद्दल अपराधी ठरविले असेल तर, शासन लेखी आदेशाद्वारे निवृत्तीवेतन किंवा कौटुंबिक निवृत्तीवेतन किंवा त्याचा काही भाग, कायमचा किंवा विशिष्ट कालावधीसाठी रोखून धरू शकेल किंवा काढून घेऊ शकेल.

मात्र, निवृत्तिवेतनाचा किंवा कौटुंबिक निवृत्तीवेतनाचा काही भाग रोखून ठेवला असेल किंवा काढून घेतला असेल तेव्हा उरलेल्या निवृत्तिवेतनाची किंवा कौटुंबिक निवृत्तीवेतनाची रक्कम, शासनाने ठरवून दिलेल्या किमान निवृत्तिवेतनाच्या रकमेहून कमी केली जाणार नाही.

(२) न्यायालयाने निवृत्तिवेतन धारकाला किंवा कौटुंबिक निवृत्तिवेतन धारकाला गंभीर गुन्ह्याबद्दल अपराधी ठरवले असेल तेव्हा, अशा अपराधसिद्धी संबंधीच्या न्यायालयाच्या निर्णयाच्या संदर्भात उप-नियम (१) अन्वये कार्यवाही केली जाईल.

(३)उप-नियम (२) खाली न येणाऱ्या प्रकरणात, शासनाला निवृत्तिवेतनधारक गंभीर गुन्ह्याबद्दल प्रथमदर्शनी दोषी वाटत असेल तर, शासन उप-नियम (१) अन्वये आदेश काढण्यापूर्वी, गंभीर शिक्षा देण्याबाबत महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ मधील नियम ८ आणि ९ मध्ये दिलेल्या कार्यपद्धतीचे अनुपालन करील.

(४) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेतील पदे धारण करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या संबंधात, उप-नियम (१) अनुसार आदेश काढण्यापूर्वी आयोगाशी विचारविनिमय करण्यात येईल.

**२७: निवृत्तीवेतन रोखून ठेवण्याचा किंवा काढून घेण्याचा शासनाचा अधिकार :**

(१) निवृत्तिवेतनधारक हा, त्याच्या सेवेच्या कालावधीत, तसेच सेवानिवृत्त होऊन पुनर्नियुक्ती नंतरच्या त्याच्या सेवेच्या कालावधीत गंभीर गैरवर्तणुकीबद्दल किंवा निष्काळजीपणाबद्दल अपराधी असल्याचे कोणत्याही विभागीय किंवा न्यायिक कार्यवाहीमध्ये दिसून आले तर, नियोक्त्याला लेखी आदेशाद्वारे, निवृत्तीवेतन किंवा त्याचा काही भाग कायमचा किंवा विशिष्ट कालावधीसाठी रोखून ठेवता येईल किंवा काढून घेता येईल आणि शासनाला झालेल्या कोणत्याही आर्थिक नुकसानीची वसुली देखील अश्या निवृत्तिवेतनातून पूर्णतः किंवा अंशतः करण्याचा आदेश नियोक्ता देईल.

मात्र, लोकसेवा आयोगाच्या कक्षेमधील पद धारण करणाऱ्या कोणत्याही अधिकाऱ्यांच्या संबंधात कोणतेही अंतिम आदेश देण्यापूर्वी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाशी विचारविनिमय करण्यात येईल :

आणखी असे की, निवृत्तिवेतनाचा कोणताही भाग रोखून ठेवला असेल किंवा काढून घेतला असेल तेव्हा, उरलेल्या निवृत्तिवेतनाची रक्कम शासनाने ठरवून दिलेल्या किमान रकमेपेक्षा कमी केली जाणार नाही.

२ (ए) शासकीय कर्मचारी सेवानिवृत्त होण्यापूर्वी किंवा पुनर्नियुक्त झाल्यानंतर सेवेत असताना त्याच्याविरुद्ध उप-नियम (१) मध्ये उल्लेख केलेली विभागीय कार्यवाही सुरु करण्यात आली असेल तर, ती कार्यवाही शासकीय कर्मचाऱ्याच्या अंतिम निवृत्तीनंतर, या नियमाखालील कार्यवाही असल्याचे मानण्यात येईल आणि शासकीय कर्मचारी सेवेत राहिला असता तर, ज्या पद्धतीने ती चालू ठेवण्यात आली असती त्याच पद्धतीने ती, ज्या प्राधिकाऱ्याने सुरु केली त्याच्याकडून चालू ठेवली जाईल व समाप्त केली जाईल.

(बी) शासकीय कर्मचारी सेवानिवृत्त होण्यापूर्वी किंवा पुनर्नियुक्त झाल्यानंतर सेवेत असताना त्याच्याविरुद्ध विभागीय कार्यवाही चालू झाली नसेल तर :-

(i) नियुक्ती प्राधिकाऱ्याच्या मंजुरीशिवाय ती चालू केली जाणार नाही,

(ii) अशी कार्यवाही सुरू करण्यापूर्वीच्या चारपेक्षा अधिक वर्षांच्या कालावधीत घडलेल्या घटनेसंबंधातील ती असता कामा नये आणि,

(iii) शासन निर्देशित करील अशा प्राधिकाऱ्याकडून व अश्या ठिकाणी आणि ज्या विभागीय कार्यवाहीमध्ये शासकीय कर्मचारी सेवेत असताना त्याच्या बडतर्फीचा आदेश देता येईल अशा विभागीय कार्यवाहीच्या पद्धतीनुसार चालवण्यात येईल.

(३) जर शासकीय कर्मचारी सेवानिवृत्त होण्यापूर्वी किंवा पुनर्नियुक्त झाल्यानंतर, सेवेत असताना त्याच्याविरुद्ध एखादी न्यायिक कार्यवाही सुरु केलेली नसेल तर, अशी कोणतीही न्यायिक कार्यवाही, ती सुरु करण्यापूर्वी चारपेक्षा अधिक वर्षांच्या कालावधीत उद्भवलेल्या वादकरणासंबंधात किंवा घडलेल्या घटनेसंबंधात सुरु केली जाणार नाही.

(४) जो शासकीय कर्मचारी नियत वयोमान होताच किंवा अन्यथा सेवानिवृत्त झाला असेल आणि ज्याच्याविरुद्ध कोणतीही विभागीय किंवा न्यायिक कार्यवाही सुरु केली असेल किंवा उप-नियम (२) खाली विभागीय कार्यवाही पुढे चालू ठेवण्यात आली असेल त्याच्या बाबतीत, नियम १३० मध्ये तरतूद केल्याप्रमाणे तातपुरते निवृत्तीवेतन मंजूर करण्यात येईल.

(५) निवृत्तीवेतन रोखून ठेवावयाचे नाही किंवा काढून घ्यावयाचे नाही असे शासनाने ठरविले असेल, परंतु निवृत्तिवेतनातून आर्थिक नुकसानीची वसुली करावयाची असा आदेश दिला असेल तेव्हा, या नियमाच्या उप-नियम (१) च्या तरतुदीच्या अधीन राहून, सामान्यपणे शासकीय कर्मचाऱ्याच्या सेवानिवृत्तीच्या दिनांकास अनुज्ञेय असलेल्या निवृत्तिवेतनाच्या एकतृतीयांशाहून अधिक दराने वसुली केली जाणार नाही.

(६) या नियमाच्या प्रयोजनासाठी :

(ए) शासकीय कर्मचाऱ्यास किंवा निवृत्तिवेतनधारकास ज्या तारखेला आरोपपत्र देण्यात आले असेल त्या तारखेस, किंवा शासकीय कर्मचाऱ्याला आधीच्या ज्या तारखेपासून निलंबनाधीन ठेवले असेल अशा तारखेस, विभागीय कार्यवाही सुरु केली असल्याचे मानण्यात येईल.

(बी) न्यायिक कार्यवाही -

(i) फौजदारी कार्यवाहीच्या बाबतीत, दंडाधिकारी जिची दाखल घेतो अशी तक्रार किंवा प्रतिवेदन पोलीस अधिकाऱ्याने ज्या तारखेस दाखल केले असेल त्या तारखेस सुरु केली असल्याचे मानण्यात येईल, आणि

(ii) दिवाणी कार्यवाहीच्या बाबतीत, वादपत्र न्यायालयाला ज्या तारखेस सादर करण्यात येईल त्या तारखेस सुरु केली असल्याचे मानण्यात येईल.

९. श्री. मेघे यांनी नियम १९ वर दर्शविलेला विश्वास याचिकाकर्त्याच्या प्रकरणाला पुढे नेत नाही. आम्ही असे सूचित करण्यासाठी नियम १९ वाचत नाही की, कर्मचाऱ्याला जर गैरवर्तन किंवा गैरव्यवहार सिद्ध झाल्याच्या आरोपावरून कामावरून काढून टाकण्यात आले असेल, तर कामावरून काढून टाकण्याचा आदेश हा निवृत्तिवेतनाचा दावा करण्यास अडथळा ठरणार नाही. जेथपर्यंत नियम १०१ चा संबंध आहे, याचिकाकर्त्याच्या प्रकरणाला पुढे नेण्याऐवजी, मूळ नियमात अशी तरतूद आहे की, ज्या कर्मचाऱ्याला सेवेतून काढून टाकण्यात आले आहे, त्याला त्याचे निवृत्तीवेतन आणि उपदानाची रक्कम गमवावी लागेल. तरतुदींवर विश्वास दर्शविण्यात आले आहे. हे सुनिश्चित आहे की, तरतूद म्हणजे कायदेविषयक हेतू मर्यादित करणे किंवा सौम्य करणे असे समजले जाऊ शकत नाही जसे की मूळ तरतुदीवरून लक्षात येते. तरतुदी अपवादात्मक परिस्थितीचा विचार करते, जेथे एखादे प्रकरण विशेष विचारात घेण्यास पात्र असल्यास, नियोक्ता अनुकंपा निवृत्तीवेतन मंजूर करू शकतो. पुढे उप-नियम (3) च्या मापदंडावर ही तरतूद समजून घेणे आवश्यक आहे ज्यामध्ये अशी तरतूद आहे की बडतर्फ केलेला कर्मचारी अनुकंपा निवृत्तिवेतनासाठी पात्र राहणार नाही.

१०. दिलेल्या परिस्थितीत 'काढून टाकणे" या अभिव्यक्तीचा वापर हा केवळ शब्दार्थांचा विषय असू शकतो- आशयापेक्षा स्वरूपाचा विषय. तथापि, आम्हाला या व्यापक

प्रश्नात अधिक खोलवर जाण्याची गरज नाही. नोंदीवरून मिळालेल्या तथ्यांनुसार, याचिकाकर्त्याने निवृत्तीवेतनाचा कायदेशीर हक्क दर्शविला नाही याबद्दल आम्ही समाधानी आहोत.

११. श्री. मेघे यांनी **१९९८(३) महा. एल. जे. ४३५ मध्ये प्रसिद्ध अण्णा देवराम लोंढे (मय्यत) तर्फे कायदेशीर वारस श्रीमती इंदिराबाई गं .भा. अण्णा लोंढे -विरुद्ध- महाराष्ट्र राज्य** या प्रकरणात दिलेल्या निर्णयाकडे आमचे लक्ष वेधले आहे. सदर कर्मचाऱ्याला भारतीय दंड संहितेच्या कलम ३०२ अन्वये दोषी ठरविण्यात आल्याने त्याला सेवेतून काढून टाकण्यात आले होते, ज्याची शिक्षा माननीय उच्च न्यायालयाने भारतीय दंड संहितेच्या कलम ३२५ मध्ये बदलली होती. माननीय सर्वोच्च न्यायालयाने सदर कर्मचाऱ्याला नियमावलीतील नियम १०१ सह नियम १०० अंतर्गत अनुकम्पा निवृत्तिवेतनासाठी सरकारकडे निवेदन करण्याची मोकळीक दिली. निवेदनावर निर्णय घेण्यापूर्वीच , सदर कर्मचारी मरण पावला आणि प्रकरणातील असामान्य आणि स्पष्ट तथ्ये पाहता, माननीय उच्च न्यायालयाने असे मानले की कर्मचाऱ्याच्या विधवेला कौटुंबिक निवृत्तीवेतन दिले गेले पाहिजे.

१२. आमच्या दृष्टिकोणाने, **अण्णा देवराम लोंढे** (उपरोल्लेखित) मधील निर्णय तथ्यांवर आधारित आहे. शारिरीक गुन्ह्याच्या शिक्षेची तुलना विश्वस्तांमध्ये ठेवलेल्या नागरिकांच्या निधीच्या गैरवापराशी होऊ शकत नाही. श्री. मेघे यांनी सूचना दिल्याप्रमाणे, याचिकाकर्त्याला नियोक्त्याकडे अनुकंपा निवृत्तीवेतनाबाबत निवेदन करण्याची परवानगी देण्याचे कोणतेही कारण आम्हाला दिसत नाही.

१३. या टप्प्यावर, श्री. कासट सादर करतात की, असे निवेदन आधीच केले गेले होते आणि नाकारले गेले होते.

१४. समन्वयक खंडपीठाने, **२०१९ (५) महा. एल. जे. १९८ मध्ये प्रसिद्ध कुलकर्णी शशिकांत भवानी -विरुद्ध- बॉम्बे फिजिकल कल्चर असोसिएशन आणि इतर** च्या प्रकरणामध्ये परिस्थिती, जरी तंतोतंत जुळणारी नसली तरी सारखी मानली आणि नियम २६ आणि २७ च्या तरतुदी लक्षात घेऊन असे मानले की, ज्या कर्मचाऱ्याला नैतिक अध: पतनाचा घटक असलेल्या गैरवर्तनाच्या सिद्ध आरोपावरून सेवेतून काढून टाकण्यात आलेले

आहे, तो निवृत्तिवेतनास पात्र नाही. आम्ही या निर्णयातील निरीक्षणाचे सुसंबद्ध सार घेऊ शकतो, जे पुढीलप्रमाणे आहे :-

> २४. सध्याच्या प्रकरणात, याचिकाकर्त्याला नैतिक अध: पतनाचा समावेश असलेल्या गंभीर गैरवर्तनाच्या सिद्ध आरोपावरून सेवेतून काढून टाकण्यात आले आहे. अशी स्थिती आहे की, जर उत्तरवादी क्रमांक २ ने निवृत्तिवेतनासाठी याचिकाकर्त्याचा दावा या आधारावर नाकारला असेल की याचिकाकर्त्याला गंभीर गैरवर्तणुकीच्या सिद्ध आरोपामुळे सेवेतून काढून टाकण्यात आलेले आहे, तर आम्हाला उत्तरवादीची कारवाई नियमांचे विरुद्ध किंवा कोणत्याही प्रकारे अनियंत्रित वाटत नाही. निवृत्तीवेतन हा याचिकाकर्त्याचा अधिकार आहे यात शंका नाही, परंतु तो सदर नियमांद्वारे शासित केला जातो. नियम २६ आणि २७ च्या साध्या वाचनाने हे पुरेपूर स्पष्ट होते की, याचिकाकर्ता गंभीर गैरवर्तनासाठी दोषी आढळल्यास, कायमस्वरूपी निवृत्तीवेतन रोखण्याचा अधिकार सरकारला आहे. याचिकाकर्त्याला सेवानिवृत्तीचे वय पूर्ण होण्यापूर्वी सेवेतून काढून टाकण्यात आले. सेवानिवृत्तीचे वय गाठण्यापूर्वी त्याला सेवेतून काढून टाकणे क्वचितच परिणामकारक ठरेल, कारण सेवा समाप्त केल्यावर निवृत्तिवेतनासाठी दावा केला जातो, तेव्हा तो नियमावलीतील नियम २६ आणि २७ मधील तरतुदींनुसार नियंत्रित केला जाईल. याचिकाकर्त्याचे आचरण आणि नैतिक पतनाचा समावेश असलेल्या सिद्ध झालेल्या गैरवर्तणुकीचे गंभीर स्वरूप, ज्यासाठी याचिकाकर्त्याला सेवेतून काढून टाकले जाते, त्यामुळे याचिकाकर्ता निवृत्तिवेतनाच्या फायद्यासाठी दावा करण्यास अपात्र ठरेल. एखाद्या कर्मचाऱ्याला सेवानिवृत्तीचे वय गाठण्यापूर्वी किंवा निवृत्तिवेतनपात्र सेवा पूर्ण होण्याआधी गंभीर स्वरूपाचे गैरवर्तणूक सिद्ध झाल्यामुळे सेवेतून काढून टाकण्यात आले असेल, तरी त्याला निवृत्तिवेतनासाठी पात्र ठरविले जाईल, अश्या परिस्थितीची कल्पना करणे शक्य नाही; तर सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्याच्या बाबतीत, निवृत्ती वेतन मिळण्याचा अधिकार भविष्यात चांगल्या आचरणाच्या अधीन आहे. नियम २६ आणि २७ मधील तरतुदींच्या

अधीन राहून, सेवानिवृत्त कर्मचाऱ्याविरुद्ध सुद्धा विभागीय कारवाई केली जाऊ शकते आणि गंभीर गैरवर्तनासाठी दोषी असल्यास, त्याच्या निवृत्तीवेतनाचे समपहरण केले जाऊ शकते.

१५. सर्वांगीण विचार केल्यावर, आम्हाला सदर याचिकेत कोणतेही सार आढळत नाही.

१६. आम्ही असे मानतो की, याचिकाकर्ता निवृत्तीवेतन मिळण्यास पात्र नाही . आम्ही नोंद घेतो की, दुसरी तक्रार म्हणजे सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधीची रक्कम न देणे आणि पाचव्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार पगाराची थकबाकी न देणे. आमची अपेक्षा आहे की, नगरपरिषदेने प्रलंबित तक्रारींचा शक्य तितक्या लवकर आणि कोणत्याही परिस्थितीत, पुढील आठ आठवड्यांत, कायद्यानुसार विचार करावा.

१७. वरील निरीक्षणांच्या अधीन राहून, खर्चाबाबत कोणताही आदेश न देता, याचिका फेटाळली जाते.

[न्यायमूर्ती श्रीमती वृषाली व्ही. जोशी] [न्यायमूर्ती रोहित बी. देव]

**<u>अस्वीकरण</u>**

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याचा/तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरिता वापर करता येणार नाही. तसेच, इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करिता वैध मानला जाईल.

X – X – X - X